Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १९३ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

शिंदेंना बदनाम करणाऱ्यांची सखोल चौकशी करा! (पान २ वर)



Selected

नेहा बोरा यांना दिल्ली हायकोर्टाचा दणका!

मुंबई। दिल्ली उच्च न्यायालयाने आयसा (AISA) अध्यक्षा नेहा बोरा यांची याचिका फेटाळल्याने त्यांना न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी १० हजार रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि एक हमीदार सादर करण्यासंदर्भात दिलेल्या नोटीसला बोरा यांनी आव्हान दिलं होतं. या प्रकरणात दिल्ली पोलिसांनी त्यांच्या याचिकेला विरोध केला होता. नेहा बोरा यांना १७ ऑक्टोबर रोजी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (BNSS) कलम १२६ अंतर्गत नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार, त्यांना १९ ऑक्टोबर रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यास सांगण्यात आलं होतं. तपास सुरू असताना शांतता राखण्यासाठी १० हजार रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि एक हमीदार का सादर करू नये, याचं कारण स्पष्ट करण्याचे निर्देश या नोटिशीत होते.

५०० कोटींच्या आरोपांवरून राजकीय वादाला तोंड; आंदोलनाची दिशा ठरवण्यापूर्वी संघटन मजबूत करण्याचा निर्धार

ऑडिओ बॉम्बनंतर जरांगे पाटलांचा नवा डाव!

'कट्टर मराठा सेवकांची फळी'!, दोन-तीन दिवसांत कामाला सुरुवात करणार

जन सम्राट टाईम्स

मुंबई | मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कथित ऑडिओ क्लिप समोर आणल्यानंतर राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. ५०० कोटी रुपये कोणाकडून कोणाला देण्यात आले, या मुद्द्यावरून भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील नेत्यांमध्ये राजकीय वादाची चर्चा सुरू झाली आहे.

या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी आता मराठा आरक्षण आंदोलनाच्या संघटनात्मक बांधणीवर भर देण्याची भूमिका जाहीर केली आहे. राज्यभरात 'कट्टर मराठा सेवकांची फळी' उभारून त्यानंतर पुढील आंदोलनाची दिशा ठरवणार असल्याचे त्यांनी सांगितले. कथित ऑडिओ रेकॉर्डिंगच्या अनुभवातून आपण अधिक सावध झाल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी मराठा समाजानेही सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक विभागात मराठा सेवकांची स्वतंत्र फळी तयार करण्यात येणार असून, या सेवकांना संपर्कासाठी व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या कोण आपल्यासोबत आहे आणि



कोण दूर गेले, हे समजणे कठीण झाले आहे. त्यामुळे आंदोलन चार दिवस उशिरा झाले तरी चालेल; मात्र आधी मराठा सेवकांची मजबूत फळी उभी करायची, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. येत्या दोन ते तीन दिवसांत या कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी प्रामाणिकपणे काम केल्यानंतरही आंदोलनाच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण झाल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. "आम्ही इमानदारीने काम केले; मात्र आमच्यासोबत जीवघेणे डाव खेळले गेले. आम्ही आरक्षण मागितले, पण त्यात मोठ्या अडचणी उभ्या केल्या," अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली. कथित ऑडिओ क्लिपमुळे पडद्यामागे काय घडत होते, याबाबत प्रश्न उपस्थित झाले असल्याचे सांगत त्यांनी मराठा समाजाने आता अधिक संघटित होण्याची गरज असल्याचे म्हटले. राज्यभरात मजबूत फळी उभी केल्याशिवाय पुढील आंदोलनात उतरणे योग्य ठरणार नसल्याची भूमिका त्यांनी मांडली. कथित ऑडिओ क्लिपनंतर महायुतीतील नेत्यांमध्ये सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांवर भाष्य करताना जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाविरोधात षड्यंत्र रचले गेले का, असा सवाल उपस्थित केला. "आम्ही तुमचे इतके काय वाईट केले की आमच्या विरोधात एवढे षड्यंत्र रचले? आमच्या समाजाचे आंदोलन चिरडण्यासाठी असे प्रयत्न का झाले?" अशा प्रश्नांद्वारे त्यांनी नाराजी व्यक्त केली. "या दुनियेत सरळ माणसाचे जगणे खूप अवघड झाले आहे," अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली. मराठा समाजाने आता कोण खरोखर सोबत आहे आणि कोणाची भूमिका काय आहे, हे ओळखले पाहिजे, असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. नव्या मराठा सेवकांच्या फळीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले

या संघटनात्मक कामानंतर पुढील आंदोलनाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, कथित ऑडिओ क्लिपमधील दावे आणि ५०० कोटी रुपयांच्या आरोपांबाबत स्वतंत्रपणे काय निष्पन्न होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, मराठा सेवकांची फळी उभारण्याच्या जरांगे पाटील यांच्या घोषणेमुळे आगामी आरक्षण आंदोलनाची दिशा आणि स्वरूप काय असेल, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. आम्ही आरक्षण मागितले, पण त्यात मोठ्या अडचणी उभ्या केल्या," अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली. कथित ऑडिओ क्लिपमुळे पडद्यामागे काय घडत होते, याबाबत प्रश्न उपस्थित झाले.

मराठवाडा पदवीधर निवडणुकीत मतदानाचा टक्का घसरला; कोणासाठी धोक्याची घंटा?

जन सम्राट टाईम्स

संभाजीनगर । प्रतिनिधी: मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या चुरशीच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील ८४२ मतदान केंद्रांवर झालेल्या मतदानानंतर रिंगणातील ४१ उमेदवारांचे भवितव्य मतपेट्यांत बंद झाले आहे. मात्र, गेल्या निवडणुकीच्या तुलनेत मतदानाच्या टक्केवारीत झालेली घट आता राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. कमी मतदानाचा फायदा नेमका कोणाला होणार आणि कोणासाठी ही धोक्याची घंटा ठरणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क सुरू आहेत. एकूण ३ लाख २६ हजार ७०० मतदार असलेल्या या निवडणुकीत संघटनात्मक ताकद, उमेदवारांचे वैयक्तिक संपर्क, स्थानिक राजकीय समीकरणे आणि मतदारांचा प्रतिसाद निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. प्रत्यक्ष निकाल जाहीर होईपर्यंत कोणत्याही उमेदवाराच्या विजयाबाबत ठोस निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५.७३ टक्के मतदान जिल्हा निवडणूक शाखेने दिलेल्या आकडेवारीनुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सायंकाळी ४ वाजेपर्यंत ५५.७३ टक्के मतदान नोंदवण्यात आले. जिल्ह्यातील २१७ मतदान केंद्रांवर एकूण ९३ हजार ३१८ मतदारांपैकी ५२ हजार ७ मतरदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष मतदारांचा सहभाग ५९.१५ टक्के, म्हणजे ३९ हजार २७० मते, तर महिला मतदारांचा सहभाग ४७.३० टक्के, म्हणजे १२ हजार ७३७ मते इतका नोंदवण्यात आला. पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांचा मतदानातील सहभाग



कमी राहिल्याचे आकडेवारीवरून दिसते. गेल्या निवडणुकीत या मतदारसंघात ६४.७९ टक्के मतदान झाले होते. त्या तुलनेत यंदा मतदानाचा टक्का कमी झाल्याने पदवीधर मतदारांमधील मतदानाबाबतची उदासीनता आणि निवडणुकीतील प्रत्यक्ष सहभाग यावर चर्चा सुरू झाली आहे. कमी मतदानाचा फायदा कोणाला? कमी मतदान झाल्यास संघटनात्मकदृष्ट्या मजबूत असलेल्या पक्षांना किंवा उमेदवारांना फायदा होऊ शकतो, असा राजकीय अनुभव सांगितला जातो. पक्षांचे सक्रिय कार्यकर्ते, स्थानिक यंत्रणा आणि निश्चित मतदारांशी असलेला संपर्क मतदानाच्या दिवशी महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र, कमी मतदानाचा फायदा नेहमी एकाच पक्षाला होतो, असे निश्चितपणे सांगता येत नाही. यंदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांतील उमेदवारांच्या लढतीकडे विशेष लक्ष लागले आहे. दोन्ही बाजूंचे शैक्षणिक क्षेत्रातील संपर्क, संघटनात्मक जाळे आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याची क्षमता यांची खरी कसोटी मतमोजणीच्या दिवशी लागणार आहे. शहरी आणि नोकरदार मतदारांची भूमिका निर्णायक? शहरी भागातील पदवीधर आणि नोकरदार मतदारांचा मतदानातील सहभाग किती राहिला, हा देखील चर्चेचा मुद्दा आहे. सुशिक्षित मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली का, की काही विशिष्ट भागांतच मतदान कमी झाले, याचे स्पष्ट चित्र उपलब्ध आकडेवारीच्या सविस्तर विश्लेषणातूनच समोर येईल. मतदानातील घट ही सत्ताधारी पक्षाविरोधातील नाराजी आहे किंवा विरोधकांना मिळालेला फायदा आहे, असा थेट निष्कर्ष सध्या काढता येत नाही. मतदानाची टक्केवारी, मतदारांचा कल आणि उमेदवारनिहाय मतविभागणी यांचा एकत्रित विचार केल्यानंतरच निकालामागील राजकीय गणित स्पष्ट होईल. २७ ऑक्टोबरच्या मतमोजणीकडे लक्ष ४१ उमेदवारांचे आव्हान, ऐनवेळी झालेली बंडखोरी, पक्षीय समीकरणे आणि मतदानातील घट यामुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लक्षवेधी ठरली आहे. आता सर्वांचे लक्ष २७ ऑक्टोबर रोजी चिकलठाणा एमआयडीसी येथे होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. मतदानाचा कमी झालेला टक्का कोणाच्या पथ्यावर पडतो, संघटनात्मक ताकद किती प्रभावी ठरते आणि मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला, याचे उत्तर मतमोजणीनंतरच मिळणार आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या राजकीय अंदाजांना पूर्णविराम देत निकालाची प्रतीक्षा करणेच योग्य ठरेल.

उपचाराच्या नावाने पैसे उकळणाऱ्या रुग्णालयांवर आता कारवाई

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली। प्रतिनिधी: कोणताही आजार आणि त्यानंतर रुग्णालय म्हटले की अंगावर अक्षरश: काटा येतो. कारण, औषधे, वैद्यकीय चाचण्या आणि उपकरणांच्या नावाखाली रुग्णांकडून पैसे उकळण्याचे काम सुरु असते. पण, आता भरमसाठ पैसे उकळणाऱ्या खासगी रुग्णालयांवर लवकरच कठोर कारवाई केली जाणार आहे. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र सादर करून रुग्णालयांकडून केली जाणारी ही आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी योग्य पावले उचलली जात असल्याचे स्पष्ट केले आहे.

रसायन आणि खते मंत्रालयाने न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार, औषधे व वैद्यकीय साहित्यांवर छापील किंमतीपेक्षा अवाजवी नफा कमावण्याच्या कुप्रथेची सरकारला पूर्ण कल्पना आहे. या समस्येची सखोल चौकशी सुरू असून, सर्व संबंधितांशी चर्चा करून योग्य ते धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. डॉ. संजय कुलश्रेष्ठ यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान सरकारने ही भूमिका मांडली. या याचिकेत नीती आयोग आणि माजी आरोग्यमंत्र्यांच्या अहवालाचा हवाला देण्यात आला होता, ज्यानुसार वैद्यकीय उपचारांच्या



अफाट खर्चामुळे देशातील सुमारे ६ कोटी कुटुंबे दरवर्षी गरिबी रेषेखाली ढकलली जातात.सरकारने स्पष्ट केले की, आतापर्यंत ९३५ अत्यावश्यक औषधांच्या कमाल किमती आणि ३८८१ नवीन औषधांचे किरकोळ दर निश्चित करण्यात आले आहेत. भारतीय औषध क्षेत्रात स्पर्धा असली तरी आरोग्य क्षेत्रातील ही दरी मिटवण्यासाठी लवकरच नवीन नियमावली लागू करण्याचे अश्वासन सरकारने दिले आहे.सर्व औषधे आणि वैद्यकीय साहित्यांच्या किमतींवर मर्यादा घालण्याच्या संदर्भात दाखल केलेल्या या शपथपत्रात सरकारने मान्य केले की, उपचारादरम्यान रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक अत्यंत असहाय्य स्थितीत असतात. त्यामुळे रुग्णालयांशी घासाधिस करण्याची किंवा दर ठरवण्याची त्यांची क्षमता नसते. याच असहायतेचा गैरफायदा घेऊन अनेक रुग्णालये रुग्णांची लूट करतात. भारतात स्वस्त औषधे तयार होत असली, तरी प्रत्यक्ष रुग्णांना मात्र उत्पादित किमतीपेक्षा कितीतरी पटीने जास्त पैसे मोजावे लागतात.रुग्णालयांच्या या मनमानी कारभाराची भीषण आकडेवारीच सरकारने न्यायालयासमोर मांडली आहे. कॅन्सरवरील औषधांवर रुग्णालये १७०% ते ७००% किंवा त्याहून अधिक नफा कमावतात. उपचारात लागणाऱ्या इतर वैद्यकीय साहित्यावर १००% ते १०००% पर्यंत मार्जिन आकारले जाते.

आंबेगाव तालुक्यात पाण्याची टंचाई

रांजणी : आंबेगाव तालुक्यातील काळेवाडी-दरेकरवाडी ग्रामपंचायत समूहातील गावरवाडी येथे सध्या पिण्याच्या पाण्याची अत्यंत भीषण टंचाई निर्माण झाली आहे. हंडाभर पाण्यासाठी स्थानिक महिलांना भरउन्हात रानोमाळ भटकंती करावी लागत असून, प्रशासनाच्या उदासीन आणि वेळकाढू कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पाणीटंचाईच्या निषेधार्थ गावातील सुमारे ३० ते ४० संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर थेट 'हंडा मोर्चा' काढून प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले आहे. गावातील पाणीप्रश्न तातडीने न सुटल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही या वेळी संतप्त महिलांनी दिला आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या जागांवर प्रायोगिक सौरऊर्जा प्रकल्प

जन सम्राट टाईम्स



मुंबई| प्रतिनिधी: सौर ऊर्जेचा प्रभावी वापर वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पावले उचलली आहेत. त्याचाच भाग म्हणून पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत पशुसंवर्धन आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालये व प्रक्षेत्रांतील उपलब्ध जागेत सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी 'महाप्रीत'सोबत सामंजस्य करार करण्यात आला. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, महाप्रीतचे संचालक दीपक कोकाटे यांनी स्वाक्षरी केल्या. पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी आदी उपस्थित होते.

यावेळी पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या की, सौर ऊर्जा प्रकल्पामुळे भविष्यात पशुसंवर्धन विभागातील सर्व इमारतींचे वीज बिल शून्यावर आणून अतिरिक्त वीज निर्मिती करून त्या विक्रीतून विभागाचे उत्पन्न वाढवण्यासाठी हा सामंजस्य करार महत्वाचा ठरणार आहे. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची उपकंपनी महात्मा फुले रिन्युएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी लिमिटेडने (महाप्रीत) पशुसंवर्धन विभागाच्या जागांवर सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यास स्वारस्य दर्शविले आहे.

कंपनीने पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या समोर याबाबत सादरीकरण केले.विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी इमारतींच्या छतांवरील जागेची उपलब्धता, प्रक्षेत्रांचे स्थळ सर्वेक्षण आणि व्यवहार्यता अभ्यास केला जाणार आहे. विस्तृत प्रकल्प अहवाल सादर झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय परिसरातील कार्यालयीन इमारतींच्या छतांवर तसेच साकूड, (ता. अंबेजोगाई, जि. बीड) येथील महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या अधिपत्याखालील प्रक्षेत्रावर प्रायोगिक तत्त्वावर सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यात वाढत्या औद्योगिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर विविध उद्योगांवर कारवाई करण्यात आली आहे.

बजावण्यात आल्या असल्याची माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रश्न उपस्थित केला. राज्य शासन स्वच्छ हवा, स्वच्छ ऊर्जा आणि स्वच्छ वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य देत असल्याचे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. मुंबई क्लायमेट वीकदरम्यान आयोजित अर्थशॉट प्राईज उपक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे बोलत होत्या. सौर ऊर्जेचा प्रभावी वापर वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पावले उचलली आहेत. त्याचाच भाग म्हणून पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत पशुसंवर्धन आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालये व प्रक्षेत्रांतील उपलब्ध जागेत सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी 'महाप्रीत'सोबत सामंजस्य करार करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

हवामान बदलासाठी 'कूल क्रायम्ब' प्रकल्प!

मुंबई विद्यापीठ-ब्रिस्टल विद्यापीठासोबत राबविणार संयुक्त मोहीम

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी स्थानिक पातळीवर शाश्वत उपाययोजना विकसित करण्याच्या उद्देशाने मुंबई विद्यापीठ आणि ब्रिटनमधील ब्रिस्टल विद्यापीठाने 'कूल क्रायम्ब' हा संयुक्त प्रकल्प सुरू केला आहे. ब्रिटिश कौन्सिल-एचएसबीसीच्या 'क्लायमेट स्किल्स ग्लोबल कोलॅबोरेशन ग्रँट्स' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून युवकांना हरित कौशल्यांचे प्रशिक्षण, हरित उद्योजकतेला प्रोत्साहन आणि समुदायाधारित हवामान कृतीला चालना दिली जात आहे. मुंबई विद्यापीठाच्या हवामान बदल आणि शाश्वतता अभ्यास केंद्राच्या समन्वयाने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. डॉ. अपर्णा फडके या प्रकल्पाचे नेतृत्व करीत असून प्रा. इंदू जॉर्ज आणि प्रा. स्मिता शुक्ला सहसमन्वयक आहेत. ब्रिस्टल विद्यापीठातील ब्रिग्स्टो इनस्टट्यूट आणि कॅबॉट इनस्टट्यूट यांचेही या उपक्रमात सहकार्य आहे. या प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर प्रदेश आणि कोकणातील सहा समुदाय सहनिर्मिती प्रयोगशाळांच्या माध्यमातून पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करून स्थानिक गरजांनुसार उपाययोजना विकसित केल्या जात आहेत.

भारतात आतापर्यंत ४१ संस्था या उपक्रमाशी जोडल्या गेल्या आहेत.प्रकल्पांतर्गत आतापर्यंत झालेल्या कामाचा आणि साध्य केलेल्या यशाचा आढावा मांडणाऱ्या 'री रूट शोकेस'



या विशेष कार्यक्रमातही त्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी होते. त्यांनी घनकचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले. ब्रिस्टल विद्यापीठाच्या प्रा. ॲग्नेस नायरन आणि ब्रिटिश कौन्सिलच्या राशी जैन व अनू थम्पी यांचीही उपस्थिती होती.ब्रिस्टलमधील समुदायांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पाच युवा प्रतिनिधींनी १२ ते १६ ऑक्टोबर या कालावधीत मुंबई विद्यापीठाला भेट दिली होती. त्यांच्यासोबत प्रा. लियांग फॉन्ग वॉंग, डॉ. गोया विल्सन आणि डॉ. पेन विल्यम्स उपस्थित होते. या भेटीदरम्यान ब्रिस्टलच्या प्रतिनिधींनी मुंबईतील जुहू मोरा गाव आणि ठाणे घनकचरा व्यवस्थापन या दोन समुदाय सहनिर्मिती प्रयोगशाळांना भेट देऊन स्थानिक समुदायांशी थेट संवाद साधला.२९ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान मुंबई विद्यापीठाचे पाच विद्यार्थी प्रतिनिधी डॉ. अपर्णा फडके यांच्या नेतृत्वाखाली ब्रिस्टलला भेट देणार आहेत. तेथील समुदायाधारित हवामान बदल अनुकूलन पद्धतींचा अभ्यास करून अनुभवांची देवाणघेवाण करणार आहेत. हरित कौशल्यांमधील उणीव, पर्यावरणपूरक नवकल्पना आणि समुदायांची हवामान बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता या विषयांवर 'री-रूट' कार्यक्रमात चर्चासत्रे आणि कार्यशाळा घेण्यात आल्या. या आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे युवकांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळणार आहे. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी स्थानिक पातळीवर शाश्वत उपाययोजना विकसित करण्याच्या उद्देशाने मुंबई विद्यापीठ आणि ब्रिटनमधील ब्रिस्टल विद्यापीठाने 'कूल क्रायम्ब' हा संयुक्त प्रकल्प सुरू केला आहे. ब्रिटिश कौन्सिल-एचएसबीसीच्या 'क्लायमेट स्किल्स ग्लोबल कोलॅबोरेशन ग्रँट्स' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून युवकांना हरित कौशल्यांचे प्रशिक्षण, हरित उद्योजकतेला प्रोत्साहन आणि समुदायाधारित हवामान कृतीला चालना दिली जात आहे.

जळगावात उड्डाणपुलावरुन क्रेन खाली कोसळली

पुलाचे काम सुरु असताना क्रेन खाली कोसळली

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : खान्देशात गेल्या काही दिवसांपासून जळगाव-पाळधी या बायपास रेल्वे पुलाची गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चा आहे. या उड्डाणपुलाचे काम प्रचंड निकृष्ट असल्याचा आरोप याआधीदेखील स्थानिकांनी केला आहे. विशेष म्हणजे अडीच महिन्यांपूर्वी या पुलाचा काही भाग खचला होता. जिल्ह्यातील आमदार, खासदारांनी घटनास्थळी जावून पाहणी केली होती. या घटनेनंतर या उड्डाणपुलावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते.

अखेर ज्या गोष्टीची भीती होती ती घटना शुक्रवारी (23 ऑक्टोबर) घडली. या उड्डाणपुलाचे दुरुस्तीचे काम सुरु असताना साईड गर्डर उचलताना क्रेन थेट 50 ते 60 फूट खाली कोसळली. या दुर्घटनेत क्रेन चालकाचा जागीच मृत्यू झाला. मिळालेली माहितीनुसार, जळगावच्या पाळधी गावाजवळील रेल्वे मार्गावरुन जाणाऱ्या उड्डाणपुलाचे दुरुस्तीचे काम सुरु आहे. या कामाचा एक भाग म्हणून साईड गर्डरचा मोठा तुकडा क्रेनच्या साहाय्याने उचलण्यात येत होता. त्याचवेळी क्रेन अंदाजे 50 ते 60 फूट उंचीवरून खाली कोसळली. क्रेन उंचीवरून खाली कोसळल्याने हा अपघात अत्यंत भीषण होता. यात चालक मधुकर धनराज पाटील यांचा मृत्यू झाला आहे. ते 44 वर्षांचे होते. ते धरणगाव तालुक्यातील वंजारी खपाट गावचे रहिवासी होते. एकनाथ शिंदेंची भीती भाजपलाही वाटायला लागली का? शिंदेंचा केसाने गळा कापण्याचा प्रयत्न? रामदास कदम यांचे गंभीर आरोप सारखी फोनवर बोलते... 22 वर्षांच्या दुसऱ्या नवऱ्याला अफेअरचा संशय, 25 वर्षीय विवाहितेचा जीव घेतला, एका चुकीने अडकला स्त्री म्हणजे रोग नाही! विद्यार्थिनीचं थेट PM मोदींना पत्र; आक्षेप



नोंदवला, पर्यायही सांगितला सुशांत सिंह राजपूतच्या उपचारासाठी रिया चक्रवर्तीने माझ्याकडे मदत मागितलेली मराठी अभिनेत्रीचा दावा, हिंदुजा रुग्णालयात झालेली भेट अडीच महिन्यांत 13 जणांचा अपघातात मृत्यू यापूर्वी तरसोद येथील रेल्वे उड्डाणपुलाचा भराव खचल्याची घटना घड़ली होती. त्यामुळे बायपास महामार्गावरील संबंधित भागाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे गेल्या तीन महिन्यांपासून महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू आहे.

परिणामी, वाहन चालकांना वाहतूक कोंडी, प्रवासासाठी लागणारा अतिरिक्त वेळ आणि अपघातांचा धोका अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दुरुस्तीचे काम लांबल्याने या मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. या कामामुळे वाहतूक जळगाव शहरातून वळवली गेल्याने या ठिकाणी अडीच ते तीन महिन्यात जवळपास 13 जणांचा अपघातात मृत्यू झाला आहे. वाहनचालकांना अनेक अडचणी

पाळधी ते तरसोद बायपास हा जळगाव परिसरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहने ये-जा करतात. मात्र, उड्डाणपुलाच्या दुरुस्तीसाठी एकेरी वाहतूक सुरू असल्याने वाहनचालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सायंकाळी उशिरापर्यंत घटनेची पोलिसात नोंद नाही या घटनांमुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अपघातांची मालिका थांबवण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांची आहे. पाळधीजवळ क्रेन कोसळून चालकाचा मृत्यू झाल्याची माहिती नातेवाइकांनी दिली असली, तरी शुक्रवारी सायंकाळी उशिरापर्यंत या प्रकरणाची पोलिसांत कुठलीही नोंद नव्हती.

खान्देशात गेल्या काही दिवसांपासून जळगाव-पाळधी या बायपास रेल्वे पुलाची गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चा आहे. या उड्डाणपुलाचे काम प्रचंड निकृष्ट असल्याचा आरोप याआधीदेखील स्थानिकांनी केला आहे. विशेष म्हणजे अडीच महिन्यांपूर्वी या पुलाचा काही भाग खचला होता. जिल्ह्यातील आमदार, खासदारांनी घटनास्थळी जावून पाहणी केली होती. या घटनेनंतर या उड्डाणपुलावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. अखेर ज्या गोष्टीची भीती होती ती घटना शुक्रवारी (23 ऑक्टोबर) घडली. या उड्डाणपुलाचे दुरुस्तीचे काम सुरु असताना साईड गर्डर उचलताना क्रेन थेट 50 ते 60 फूट खाली कोसळली. या दुर्घटनेत क्रेन चालकाचा जागीच मृत्यू झाला.

संपादकीय

मराठवाडा तहानलेला, तरी पाण्याची उधळपट्टी कशासाठी?

मराठवाड्यात दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असताना पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व समजून घेण्याची वेळ आली आहे. खरीप हंगामाने शेतकऱ्यांच्या हातात निराशा दिली, रब्बी हंगामासाठी पाण्याची शाश्वती नाही आणि ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे.

ऑक्टोबर महिन्यातच पाण्याची अशी स्थिती असेल, तर जानेवारी-फेब्रुवारीमध्ये परिस्थिती किती गंभीर होईल, याचा विचार करूनच अंगावर काटा येतो. एका बाजूला हंडाभर पाण्यासाठी महिलांची पायपीट सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला शहरांमध्ये गाड्या, घरे आणि रस्ते धुण्यासाठी पाण्याची उधळपट्टी केली जात आहे. हा केवळ विरोधाभास नाही, तर सामाजिक संवेदनशीलतेची कसोटी आहे. दुष्काळ हा निसर्गाचा प्रकोप असू शकतो; मात्र पाण्याची नासाडी ही मानवनिर्मित समस्या आहे. पाऊस कमी पडला, धरणांमध्ये साठा घटला किंवा भूजलपातळी खालावली, तर त्यावर एका दिवसात उपाय करता येत नाही. परंतु उपलब्ध पाण्याचा वापर कसा करायचा, पाण्याची बचत कशी करायची आणि प्रत्येक नागरिकापर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी कोणती खबरदारी घ्यायची, हे निश्चितच आपल्या हातात आहे. दुर्दैवाने, संकटाची चाहूल लागूनही अनेक ठिकाणी पाण्याच्या वापराबाबत आवश्यक गांभीर्य दिसत नाही. धरणांतील पाणीसाठा घटला; संकटाची चाहूल स्पष्ट मराठवाड्यातील धरणांमध्ये ऑक्टोबरच्या सुरुवातीला केवळ ४३.६६ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची आकडेवारी चिंताजनक आहे. गतवर्षी याच काळात हा साठा ८५ टक्क्यांहून अधिक होता. म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत उपलब्ध जलसाठ्यात मोठी घट झाली आहे. हा फरक केवळ आकड्यांचा खेळ नाही; त्यामागे शेती, पिण्याचे पाणी, जनावरांची तहान आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे भविष्य दडलेले आहे. धरणातील पाणी हे अमर्यादित साधन नाही. एकदा साठा कमी झाला की त्याची भरपाई करण्यासाठी पुढील पावसाची प्रतीक्षा करावी लागते. मात्र पाऊस कधी आणि किती पडेल, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे पावसाच्या आशेवर अवलंबून राहण्याऐवजी उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात बदल करणे, पर्यायी जलस्रोतांचा विचार करणे आणि गळती रोखणे याबरोबरच नागरिकांनीही वापर मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. नळाला पाणी आठ ते वीस दिवसांनी; ही कोणती विकासाची ग्वाही? मराठवाड्यातील अनेक शहरांमधील पाणीपुरवठ्याची परिस्थिती दुष्काळाची तीव्रता दाखवते. छत्रपती संभाजीनगर शहरात साधारण पाच दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. विभागातील अनेक नगरपालिका क्षेत्रांत सहा दिवसांच्या अंतराने पाणी मिळत असून, काही शहरांमध्ये आठ दिवसांनंतर नळाला पाणी येते. बीड शहरातील काही भागांत १५ ते २० दिवसांनी पाणी मिळत असल्याची नोंद आहे. अंबडमध्ये अकरा दिवसांनी, तर परभणी शहरात आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होत असल्याचे दिलेल्या माहितीत नमूद आहे. लातूर शहरात एक ऑक्टोबरपासून चार दिवसांऐवजी सहा दिवसांनी पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

मांजरा प्रकल्पात केवळ दहा टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याने हा निर्णय घ्यावा लागल्याचे सांगितले जाते. परभणी जिल्ह्यातील निम्न दुधना प्रकल्पात २२ टक्के जिवंत साठा असल्याने परभणीसह जालना जिल्ह्यातील काही शहरांच्या पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. हिंगोलीतील काही भागांत आठ ते बारा दिवसांनी पाणी मिळत असल्याच्या तक्रारी आहेत, तर परळी शहरासाठी दर दहा दिवसांनी पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. या आकडेवारीतील प्रत्येक दिवस नागरिकांच्या जगण्याशी जोडलेला आहे. पाणी येण्याच्या आदल्या दिवशी घराघरांत साठवणुकीची तयारी करावी लागते. पाणीपुरवठा झाला नाही, तर पुन्हा प्रतीक्षा सुरू होते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांसाठी ही प्रतीक्षा अधिक त्रासदायक ठरते. महिलांवर पाणी भरण्याची जबाबदारी अधिक प्रमाणात येते. त्यामुळे पाणीटंचाई ही केवळ जलव्यवस्थापनाची समस्या नसून ती सामाजिक आणि मानवी प्रतिष्ठेशी संबंधित समस्या आहे

एकनाथ शिंदेंना बदनाम करणाऱ्यांची सखोल चौकशी करा!

श्रीकांत शिंदेंच्या नावाच्या उल्लेखाने राजकीय चर्चेला उधाण

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावाचा उल्लेख झाल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बदनाम करून त्यांना राजकीय अडचणीत आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. तसेच शिवसेना आणि भाजपमध्ये मतभेद निर्माण करण्याच्या संभाव्य प्रयत्नांचीही चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. 'एकनाथ शिंदेंना गोत्यात आणण्याचा प्रयत्न' कथित ऑडिओ क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावाचा उल्लेख झाल्याच्या पार्श्वभूमीवर गुलाबराव पाटील यांनी या प्रकरणाबाबत



संशय व्यक्त केला. श्रीकांत शिंदे यांचे नाव पुढे करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या प्रकरणात ओढण्याचा आणि त्यांची राजकीय प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचे पाटील म्हणाले. "आपल्या नेत्याला बदनाम करून त्यांना गोत्यात आणण्याचा हा जाणीवपूर्वक रचलेला डाव आहे," अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, कथित ऑडिओ क्लिपमधील दावे आणि त्यामागील वस्तुस्थिती तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. शिवसेना-भाजपमध्ये तेढ निर्माण करण्याचा संशय या प्रकरणामागे राजकीय हेतू असण्याची शक्यता व्यक्त करताना गुलाबराव पाटील यांनी शिवसेना आणि भाजपमध्ये मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे का, याचीही चौकशी करण्याची गरज असल्याचे सांगितले. राजकीय आरोप-प्रत्यारोपांऐवजी या प्रकरणातील सत्य समोर येण्यासाठी निष्पक्ष आणि सखोल तपास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कथित क्लिपची सत्यता, त्यातील संभाषणाचा संदर्भ आणि करण्यात आलेल्या आरोपांची वस्तुस्थिती तपासातून स्पष्ट व्हावी, अशी अपेक्षाही या भूमिकेतून व्यक्त झाली. ५०० कोटी रुपयांचा आरोप पाटलांनी फेटाळला मनोज जरांगे पाटील यांना ५०० कोटी रुपये दिल्याच्या आरोपावर प्रतिक्रिया देताना गुलाबराव पाटील यांनी हा दावा फेटाळून लावला. एकनाथ शिंदे यांनी ५०० कोटी रुपये दिलेले नाहीत आणि मनोज जरांगे पाटील यांनीही ते घेतलेले नाहीत, असे पाटील यांनी म्हटले. त्यामुळे या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचा दावा त्यांनी केला. या आरोपांबाबत संबंधितांकडून मांडण्यात आलेल्या भूमिका आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच वस्तुस्थिती स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. मुख्यमंत्र्यांकडे सखोल चौकशीची मागणी "माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, या प्रकरणाची कसून चौकशी करावी. तपासात जे सत्य समोर येईल, ते जनतेसमोर आले पाहिजे. आमच्या नेत्याला बदनाम करण्यासाठी हा प्रकार केला जात असेल, तर त्यामागचे सत्यही उघड झाले पाहिजे," अशी मागणी गुलाबराव पाटील यांनी केली. दरम्यान, कथित ऑडिओ क्लिपमधील दावे, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावाचा उल्लेख आणि ५०० कोटी रुपयांच्या आरोपांबाबत तपासातून काय निष्पन्न होते, याकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

आयुर्वेदिक औषधांच्या आडून भांगाच्या गोळ्यांची तस्करी

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : आयुर्वेदिक औषधांच्या आडून भांगाच्या गोळ्यांची तस्करी करण्याचा प्रकार धुळे तालुका पोलिसांनी उघडकीस आणला आहे. मुंबई-आग्रा महामार्ग क्रमांक ३ वर पोलिसांनी सापळा रचून आयशर वाहन अडवले. या कारवाईत उत्तर प्रदेशातील दोघांना अटक करण्यात आली असून, वाहनासह एकूण १८ लाख ९८ हजार ७८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे नशेच्या पदार्थांच्या तस्करीविरोधातील पोलिसांच्या मोहिमेला महत्त्व आले आहे. गुप्त माहितीच्या आधारे कारवाई धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील कानपूर येथून भांगाच्या गोळ्या आयशर वाहनातून भिवंडीच्या दिशेने नेल्या जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची दखल घेत तालुका पोलिसांच्या पथकाने मुंबई-आग्रा महामार्गावर सापळा रचला. संशयित आयशर वाहन आढळताच पोलिसांनी ते अडवून तपासणी केली. या कारवाईदरम्यान भांगाच्या गोळ्यांची तस्करी होत असल्याचा संशय असलेला माल आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी संबंधित माल आणि वाहन ताब्यात घेत दोघांविरुद्ध कारवाई केली. उत्तर प्रदेशातील दोघांना अटक या प्रकरणात पोलिसांनी पुढील दोघांना अटक केली आहे. १. जमशेद अहमद जुल्फेकार अहमद शाह (वय ३५) — प्रतापगड, उत्तर प्रदेश २. हबीबुजमा कामरूजजमा अन्सारी (वय ३९) — प्रतापगड, उत्तर प्रदेश पोलिसांनी आयशर वाहनासह एकूण १८ लाख ९८ हजार ७८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या तस्करीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच संबंधित माल कोठून आणण्यात आला आणि तो कोणाकडे पोहोचविण्यात येणार होता, याबाबत तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, तस्करीच्या साखळीतील अन्य संबंधित व्यक्तींचा सहभाग आहे का, याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

विधान परिषदेच्या ५ जागांसाठी मतदान पूर्ण; २७ ऑक्टोबरला निकालाचा फैसला!

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता सर्वांचे लक्ष २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. नागपूर आणि मराठवाडा पदवीधर मतदारसंघांसह अमरावती शिक्षक तसेच पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांत महायुती आणि महाविकास आघाडीने आपली ताकद पणाला लावली. विविध मतदारसंघांत मतदानाची टक्केवारी वेगवेगळी राहिल्याने निकालाबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. नागपूर आणि मराठवाडा पदवीधर मतदारसंघांत मतदानाचा टक्का ६० टक्क्यांच्या आसपास राहिला, तर अमरावती शिक्षक मतदारसंघात ९१ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. कमी-अधिक मतदानाचा कोणत्या उमेदवाराला फायदा होणार, याचे चित्र मतमोजणीनंतरच स्पष्ट होईल. नागपूर पदवीधर मतदारसंघात ६०.६९ टक्के मतदान



नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात सायंकाळी ४ वाजेपर्यंतच्या अंदाजित आकडेवारीनुसार ६०.६९ टक्के मतदान नोंदवण्यात आले. वर्धा जिल्ह्यात सर्वाधिक ६८.८६ टक्के, तर भंडारा जिल्ह्यात सर्वांत कमी ५२.३५ टक्के मतदान झाले. नागपूर विभागातील एकूण ६०.६९ टक्के मतदानामुळे पदवीधर मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने जाणार, याबाबत राजकीय चर्चेला सुरुवात झाली आहे. मराठवाडा पदवीधरमध्ये ५९.६२ टक्के मतदान मराठवाडा पदवीधर मतदारसंघात सरासरी ५९.६२ टक्के मतदान झाले. धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ६२.५३ टक्के, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५.७३ टक्के मतदानाची नोंद झाली. या मतदारसंघातील मतदानाचा टक्का आणि जिल्हानिहाय फरक लक्षवेधी ठरला आहे. संघटनात्मक ताकद, उमेदवारांचे वैयक्तिक संपर्क आणि मतदारांची पसंती या बाबी निकालावर प्रभाव टाकू शकतात. नांदेडमध्ये महिलांचा मतदानातील सहभाग कमी नांदेड जिल्ह्यात सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत ५९.८१ टक्के मतदान झाले. जिल्ह्यातील १२० मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली.

भुसावळच्या शासकीय तांत्रिक विद्यालयाचे नामांतर

आता 'ॲड. डी. के. चौधरी शासकीय तांत्रिक विद्यालय' म्हणून ओळख!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी : राज्य शासनाने राज्यातील २५ शासकीय तांत्रिक विद्यालयांची नावे बदलण्यास मान्यता दिली आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णयानुसार भुसावळ येथील शासकीय तांत्रिक विद्यालयाचे नामांतर 'ॲड. डी. के. चौधरी शासकीय तांत्रिक विद्यालय, भुसावळ' असे करण्यात आले आहे. शासनाच्या यादीतील अनुक्रमांक २२ नुसार झालेल्या या नामांतरामुळे भुसावळच्या सामाजिक, राजकीय आणि कामगार चळवळीतील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असलेल्या स्वर्गीय ॲड. दगडू काशीराम चौधरी यांच्या कार्याचा गौरव झाला आहे. या निर्णयाचे भुसावळसह जळगाव जिल्ह्यातील नागरिक आणि कामगार वर्गाकडून स्वागत होत आहे. सामान्यांच्या हक्कांसाठी लढणारे ॲड. डी. के. चौधरी स्वर्गीय ॲड. दगडू काशीराम चौधरी यांचा जन्म ६ जून १९२९ रोजी भुसावळ येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. भुसावळ येथील रेल्वे विभागात स्टेनोग्राफर म्हणून नोकरी करत असतानाच त्यांनी बऱ्हाणपूर येथून एलएल.बी.चे शिक्षण पूर्ण केले. रेल्वे सेवेत असताना त्यांनी रेल्वे



कामगारांच्या प्रश्नांसाठी युनियनच्या माध्यमातून संघर्ष केला. कामगारांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आणि युनियनचे अध्यक्षपदही भूषविले. पुढे रेल्वेची नोकरी सोडून त्यांनी पूर्णवेळ वकिली आणि समाजसेवेला वाहून घेतले. 'सामान्यांचा वकील' म्हणून मिळवली ओळख वकिलीच्या व्यवसायात असताना गरीब, गरजू आणि वंचित नागरिकांना मदत करण्यावर ॲड. चौधरी यांनी भर दिला. अनेक गरजूंची कामे त्यांनी विनामोबदला केल्याने त्यांची 'सामान्यांचा वकील' अशी ओळख निर्माण झाली. कामगार, गरीब आणि शोषित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला. १९७५ मध्ये भुसावळ नगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीत ते बहुमताने विजयी झाले. पुढे १९८५ मध्ये जनता पक्षाच्या माध्यमातून त्यांनी आमदार म्हणूनही काम केले. नगराध्यक्षपदाच्या आणि आमदारकीच्या कार्यकाळात भुसावळच्या विकासासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविल्याचे सांगितले जाते. भुसावळच्या विकासात भुसावळ शहराच्या विकासासाठी ॲड. डी. के. चौधरी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. नाल्यातील सांडपाण्याचे नियोजन, भूमिगत वाहिन्यांद्वारे सांडपाणी व्यवस्थापन आणि त्यावर प्रक्रिया करण्याच्या योजनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतल्याचे नमूद केले जाते. पंचशील नगर, समता नगर आणि दीनदयाळनगर यांसारख्या वस्त्यांच्या निर्मितीशीही त्यांचे नाव जोडले जाते. श्यामप्रसाद मुखर्जी उद्यान आणि गोरगरिबांसाठी सुरू करण्यात आलेले 'झुणका-भाकर केंद्र' या उपक्रमांमध्येही त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. राजकीय पदावर असतानाही सामान्य नागरिकांशी असलेली नाळ त्यांनी कायम जपली. साधी राहणी, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याची भूमिका यामुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली. १८ डिसेंबर २००९ रोजी त्यांचे निधन झाले; मात्र त्यांचे सामाजिक कार्य आजही स्मरणात आहे. काय आहे शासन निर्णय? कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि त्यांच्यात विविध कौशल्ये विकसित करणे यासाठी शासकीय तांत्रिक विद्यालये कार्यरत आहेत.

बदलापूर एमआयडीसीमुळे उल्हासनदी धोक्यात!

जन सम्राट टाईम्स

बदलापूर | प्रतिनिधी : बदलापूर एमआयडीसीतील रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी पुन्हा फुटली आहे. रासायनिक सांडपाणी वाहिनीच्या फुटीचे सत्र रोखण्यासाठी सुमारे १२८ कोटींचा खर्च करून एमआयडीसी प्रशासनाने नवीन रासायनिक सांडपाणी वाहिनी टाकण्याचे काम केले आहे. मात्र, त्यानंतरही वाहिनी फुटीचे सत्र सुरू असल्याने या कामाच्या दर्जाविषयी तसेच तांत्रिक नियोजनाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण कामाची चौकशी करण्याची मागणी भाजपाचे नगरसेवक तथा नियोजन समिती सभापती संभाजी शिंदे यांनी केली आहे. बदलापूर एमआयडीसीतील रासायनिक सांडपाणी अंबरनाथपर्यंत वाहून नेणारी रासायनिक सांडपाणी वाहिनी पुन्हा फुटल्याने सोमवारी मोठ्या प्रमाणावर रासायनिक सांडपाणी रस्त्यावर पसरले, नाल्यामध्ये मिसळले, अनेक इमारतींच्या पाण्याच्या टाक्यांमध्येही हे रासायनिक सांडपाणी मिसळले. तसेच नाल्यावाटे हे रासायनिक सांडपाणी उल्हासनदीच्या पाण्यातही मिसळले गेले असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण झाले असल्याबद्दल कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या नियोजन व विकास समितीचे सभापती संभाजी शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

धरणगावात रथोत्सवातील लेझीम, ढोल व शालेय पथकांचा सन्मान!

कल्पिताताई पाटील फाउंडेशन व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा उपक्रम!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: धरणगाव शहरातील वैभवशाली परंपरा लाभलेल्या श्री बालाजी महाराजांच्या रथोत्सवात सहभागी झालेल्या लेझीम पथक, ढोल पथक आणि शालेय पथकांचा कल्पिताताई पाटील फाउंडेशन व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात सत्कार करण्यात आला. लोकनियुक्त नगराध्यक्षा लिलाताई सुरेश चौधरी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन पथकांचा गौरव करण्यात आला. रथोत्सवातील सहभागाचा गौरव धरणगाव शहरातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री बालाजी महाराजांच्या रथोत्सवाचे आयोजन श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. या रथोत्सवात उत्साहाने सहभागी झालेल्या विविध लेझीम, ढोल व शालेय पथकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मेन रोडवरील कोट बाजार परिसरात, गणेश पान सेंटरजवळ सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. रथोत्सवात सहभागी झालेल्या भाविकांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच शहरातील आणि बाहेरगावांतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, विधी व न्याय, व्यापार, पोलीस प्रशासन, क्रीडा, मनोरंजन, पत्रकारिता आणि शासकीय-प्रशासकीय क्षेत्रांतील मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. रथाच्या मार्गावर भाविकांसाठी केळी, सरबत, साबुदाणा खिचडी आणि पाण्याचे वाटप करणाऱ्या दात्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. लेझीम पथकांचा सन्मान रथोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या पुढील लेझीम पथकांचा सत्कार करण्यात आला. १. बालकवी ठोंबरे लेझीम पथक २. जय बजरंग व्यायामशाळा ३. जयहिंद व्यायामशाळा ४. भगवा ग्रुप मित्र परिवार



५. सावता माळी व्यायामशाळा ६. हुतात्मा भगतसिंग व्यायामशाळा ७. महात्मा फुले व्यायामशाळा ८. राजपूत व्यायामशाळा ढोल पथकांचाही गौरव रथोत्सवात ढोलवादनाने उत्साह निर्माण करणाऱ्या पुढील पथकांचा सन्मान करण्यात आला. १. शिवसंकल्प ढोल पथक २. जयहिंद ढोल पथक ३. न्यू जयहिंद ढोल पथक ४. संत बाळूमामा ढोल पथक ५. बालाजी ग्रुप बालगोपाल ढोल पथक ६. माळीवाडा ढोल पथक ७. त्रिमूर्ती ढोल पथक ८. बालगोपाल ढोल पथक ९. बाल हनुमान ढोल पथक जय बजरंग सेनेच्या देखाव्याने वेधले लक्ष रथोत्सवात जय बजरंग सेनेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या देखाव्याने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. दुष्काळी परिस्थितीमुळे होरपळणारा शेतकरी आणि आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयाकडे त्याला प्रवृत्त करणाऱ्या परिस्थितीचे चित्रण या देखाव्यातून करण्यात आले. या माध्यमातून बालाजी महाराजांच्या चरणी साद घालण्याचा भावनिक प्रयत्न करण्यात आला. सामाजिक वास्तव अधोरेखित करणाऱ्या या देखाव्याची उपस्थितांमध्ये चर्चा झाली. कल्पिताताई पाटील फाउंडेशन, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि नगराध्यक्षा लिलाताई सुरेश चौधरी यांच्या वतीने सर्व पथकांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष प्रा. डी. आर. पाटील, उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, सचिव प्रशांत वाणी, पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड, उद्योगपती जीवनसिंह बयस, माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, सुनील घनशाम सोनार, माजी उपनगराध्यक्षा अरुणाताई कंखरे, डॉ. अर्चना काबरा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रतिभा शिरसाठ, महिला जिल्हाध्यक्षा कल्पिता पाटील आणि नगरसेविका ज्योती लक्ष्मण पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळ, जगदंबा टेंट हाऊस आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चुडामण पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे परिश्रम कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, राजेंद्र धनगर, तालुकाध्यक्ष संजय पाटील, कार्याध्यक्ष हितेंद्र पाटील, उपाध्यक्ष रमेश महाजन, ज्येष्ठ नेते नारायण चौधरी, अशोक झुंजारराव, शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, सचिव नंदूनाना धनगर, उपाध्यक्ष दीपक झुंजारराव, ज्येष्ठ पदाधिकारी अमित शिंदे, एकनाथ पाटील, कैलास मराठे, अमोल हरपे, मकरध्वज पवार, मोहन पाटील सर, खलील खान, युवक जिल्हा कार्याध्यक्ष मोहित पवार, मीडिया तालुकाप्रमुख रविंद्र महाजन, युवक तालुकाध्यक्ष परेश गुजर, खजिनदार दिनकर पाटील, युवक शहराध्यक्ष जुनेद बागवान, उपाध्यक्ष बालाजी महाजन, कार्याध्यक्ष सागर महाले, संघटक बबलू पाटील, प्रफुल पवार, कृष्णा कंखरे, प्रविण पाटील, विद्यार्थी अध्यक्ष साहिल खान, आदेश भाई आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहित पवार यांनी केलेधरणगाव शहरातील वैभवशाली परंपरा लाभलेल्या श्री बालाजी महाराजांच्या रथोत्सवात सहभागी झालेल्या लेझीम पथक, ढोल पथक आणि शालेय पथकांचा कल्पिताताई पाटील फाउंडेशन व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात सत्कार करण्यात आला. लोकनियुक्त नगराध्यक्षा लिलाताई सुरेश चौधरी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन पथकांचा गौरव करण्यात आला. रथोत्सवातील सहभागाचा गौरव धरणगाव शहरातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री बालाजी महाराजांच्या रथोत्सवाचे आयोजन श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. या रथोत्सवात उत्साहाने सहभागी झालेल्या विविध लेझीम, ढोल व शालेय पथकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मेन रोडवरील कोट बाजार परिसरात, गणेश पान सेंटरजवळ सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. रथोत्सवात सहभागी झालेल्या भाविकांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच शहरातील आणि बाहेरगावांतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, विधी व न्याय, व्यापार, पोलीस प्रशासन, क्रीडा, मनोरंजन, पत्रकारिता आणि शासकीय-प्रशासकीय क्षेत्रांतील मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. रथाच्या मार्गावर भाविकांसाठी केळी, सरबत, साबुदाणा खिचडी आणि पाण्याचे वाटप करणाऱ्या दात्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पत्र; कु. भैरवी गोसावीच्या कलागुणांचे कौतुक!

जन सम्राट टाईम्स



जळगाव । प्रतिनिधी : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे हाताने रेखाटलेले सुंदर पेन्सिल स्केच आणि पत्र पाठविणाऱ्या जळगावच्या कु. भैरवी मुक्ता मुकुंद गोसावी हिला पंतप्रधान कार्यालयाकडून आभारपत्र प्राप्त झाले आहे. तिच्या या कलात्मक उपक्रमाची दखल घेतल्याने कुटुंबीय, शिक्षक आणि परिचितांकडून तिचे कौतुक व अभिनंदन होत आहे. पेन्सिल स्केचमधून व्यक्त केला आदर जळगाव शहरातील बालविश्व विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या भैरवीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वतःच्या हाताने त्यांचे पेन्सिल स्केच रेखाटले होते. या चित्रासोबत तिने पत्रही पाठविले होते. पंतप्रधान कार्यालय, नवी दिल्ली येथून तिच्या पत्राची व चित्राची दखल घेण्यात आली असून, पंतप्रधानांकडून शुभेच्छा व आभार व्यक्त करणारे पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे. विक्रमी रक्तदाते म्हणून परिचित असलेले मुकुंद गोसावी यांची भैरवी कन्या आहे. बालवयातच आपल्या कलेच्या माध्यमातून देशाच्या पंतप्रधानांप्रती आदर व्यक्त करण्याच्या तिच्या या प्रयत्नाला मिळालेल्या प्रतिसादामुळे कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित झाला आहे. पंतप्रधान कार्यालयाच्या पत्रामुळे नवी प्रेरणा भैरवीला मिळालेले आभारपत्र तिच्यासाठी आनंदाची आणि प्रेरणेची बाब ठरली आहे. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कलात्मक अभिव्यक्ती आणि स्वतःच्या भावना व्यक्त करण्याची क्षमता या उपक्रमातून अधोरेखित झाली आहे. अभ्यासासोबतच चित्रकला, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्त्व विकसित करावे, याचे उदाहरण भैरवीच्या प्रयत्नातून समोर आले आहे. कोरोना काळातही जनजागृतीचे कार्य भैरवीने चित्रकलेसोबतच सामाजिक जनजागृतीच्या क्षेत्रातही सहभाग नोंदविला आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळात जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाने तयार केलेल्या विशेष जनजागृती लघुचित्रपटाच्या माध्यमातून तिने समाजाला महत्त्वपूर्ण संदेश देण्याचे काम केले होते. संकटाच्या काळात जनजागृतीच्या उपक्रमात सहभाग घेण्याचा तिचा हा प्रयत्न उल्लेखनीय ठरला. तलवारबाजीसह विविध खेळांतही नैपुण्य शालेय जीवनात विविध क्षेत्रांत सक्रिय असलेल्या भैरवीने जिल्हास्तरीय शासकीय शालेय स्पर्धांमध्ये तलवारबाजीसह विविध खेळांतही नैपुण्य मिळविले आहे. चित्रकला, सामाजिक जनजागृती आणि क्रीडा अशा विविध क्षेत्रांत ती आपली क्षमता सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंतप्रधान कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रामुळे भैरवीच्या कलात्मक प्रयत्नांना प्रोत्साहन मिळाले असून, तिच्या या यशाबद्दल कुटुंबीय, शिक्षक आणि शाळा परिवारातून अभिनंदन केले जात आहे. भविष्यातही ती विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आदिवासी भागात रोजगारनिर्मितीला चालना!

'निसर्गदेवता वनौषधी शेतकरी उत्पादक कंपनी'चे उद्घाटन

जन सम्राट टाईम्स



धडगाव। प्रतिनिधी : नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भागात स्थानिक रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने धडगाव तालुक्यातील कालीबेल येथे 'निसर्गदेवता वनौषधी शेतकरी उत्पादक कंपनी'च्या कार्यालयाचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या डॉ. श्रावण वळवी आणि डॉ. प्रताप पाडवी यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या या कंपनीमुळे परिसरातील वनौषधी शेतीला प्रोत्साहन मिळण्यासह शेतकरी, महिला आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. वनौषधी उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न कालीबेल आणि परिसरात सफेद मुसळी, अश्वगंधा, शतावरी यांसारख्या विविध वनौषधींचे उत्पादन घेतले जाते. या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे, स्थानिक शेतकऱ्यांना व्यावसायिक दृष्टिकोनातून सक्षम करणे आणि वनौषधींवर आधारित उत्पादनांच्या निर्मितीला चालना देणे हा कंपनीचा प्रमुख उद्देश आहे. वनौषधींपासून औषधनिर्मिती करण्याच्या दृष्टीने संशोधन सुरू असल्याची माहिती कंपनीच्या संचालकांनी दिली. आदिवासी युवकांनी उद्योग-व्यवसायाकडे वळावे उद्घाटनप्रसंगी सुरत येथील उद्योजक तरुणभाई पटेल उपस्थित होते.

आदिवासी युवकांनी केवळ नोकरीवर अवलंबून न राहता उद्योग-व्यवसायाकडेही वळावे, असे आवाहन त्यांनी केले. युवकांना व्यवसायाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेता यावे, यासाठी सुरतमध्ये व्यवसाय शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ राजेंद्र दहातोंडे यांनी कंपनीला तांत्रिक मार्गदर्शनासाठी सहकार्य करण्याचे सांगितले. आत्मा कृषी विभागाचे प्रकल्प संचालक दीपक पटेल यांनी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नमूद केले. 'शेतकरी हाच व्यापारी' ही भूमिका महत्त्वाची मशरूम शेती व्यवसायाचे मार्गदर्शक तथा कालो कुणबी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र वसावे आणि लीलाताई वसावे यांनी नवउद्योजकांना मार्गदर्शन केले.

मलकापूरात कायद्याचे धाक? कायदा-सुव्यवस्थेबाबत नागरिकांच्या मनात चिंता

जन सम्राट टाईम्स



मलकापूर । (प्रतिनिधी): मलकापूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. 'मलकापूर शहरात पोलिस प्रशासनाचे राज्य आहे की गुन्हेगारांचे?' तसेच 'शहरातील कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती कोणत्या दिशेने जात आहे?' असे प्रश्न उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेऊन गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य हवे शहरातील शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्यास त्यामागील कारणांचा शोध घेऊन तक्रारींची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. कायद्याचा धाक कायम राहण्यासाठी पोलिसांची सतर्कता, नियमित गस्त आणि गुन्हेगारी प्रवृत्तींवर वेळेत नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे ठरते. गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना गरजेच्या गुन्हा घडल्यानंतर तपास करून संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहेच; मात्र गुन्हे घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. शहरातील संवेदनशील भागांत नियमित पोलिस गस्त वाढवणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षिततेचा आढावा घेणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

कायद्यापुढे सर्व समान आहेत, हा विश्वास नागरिकांच्या मनात निर्माण होणे गरजेचे आहे. पोलिस प्रशासनाच्या कामकाजात तत्परता, पारदर्शकता आणि नागरिकांशी प्रभावी संवाद असल्यास जनतेचा विश्वास अधिक दृढ होऊ शकतो. तक्रारींची दखल घेऊन ठोस कृतीची अपेक्षा शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष न करता संबंधित तक्रारींची वस्तुस्थिती तपासणे आवश्यक आहे.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबवणे, नागरिकांशी समन्वय वाढवणे आणि आवश्यक त्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त व गस्त अधिक प्रभावी करणे, ही काळाची गरज आहे. मलकापूर शहरात कायद्याचे राज्य कायम राहावे, सर्वसामान्य नागरिकांना निर्भयपणे वावरता यावे आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे पोलिस प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणती पावले उचलते आणि कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी कशा प्रकारे कार्यवाही करते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

बालाजी रथोत्सवानिमित्त सहारा बहुद्देशीय संस्थेतर्फे भाविकांना पाणीवाटप!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: धरणगाव येथील ऐतिहासिक व प्रसिद्ध श्री बालाजी महाराज रथोत्सवाच्या निमित्ताने सहारा बहुद्देशीय संस्था, धरणगाव यांच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. रथोत्सवासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणाऱ्या भाविकांना दिलासा देणाऱ्या या उपक्रमातून संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली. या उपक्रमाला शहरातील विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि व्यापारी क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी संस्थेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. सेवाभावी उपक्रमाला मान्यवरांची उपस्थिती बालाजी महाराज रथोत्सवाच्या उत्सवी वातावरणात भाविकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम संस्थेतर्फे राबविण्यात आला. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक सेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांकडून प्रतिसाद मिळाला. या वेळी सहारा बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक लक्ष्मण माळी, उपाध्यक्ष विनोद रोकडे, सचिव रमेश चव्हाण, पवन महाजन, रणजीत शिकरवार, डॉ. गणेश माळी, दीपक बाविस्कर आणि सुबोध खैरनार यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार रथोत्सवादरम्यान उपक्रमाला भेट देणाऱ्या मान्यवरांमध्ये बालाजी वाहन मंडळाचे अध्यक्ष प्रा. डी. आर. पाटील, शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय महाजन, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे ॲड. वसंतराव बोलणे, शिवसेना गटनेते विलास महाजन, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नगरसेवक परमेश्वर महाजन व सुनील चौधरी, युवासेना उपजिल्हाप्रमुख हेमंत महाजन, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहरप्रमुख लक्ष्मण पाटील आणि माजी गटनेते कैलास माळी यांचा समावेश होता. तसेच पत्रकार आबासाहेब वाघ, बाळासाहेब जाधव, माळी समाजाचे अध्यक्ष व्ही. टी. माळी, सचिव आर. डी. महाजन, सीआयएसएफ जवान समाधान महाजन, शिवसेना प्रसिद्धीप्रमुख गजानन महाजन, धोबी समाज लॉन्ड्री असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रकाश जाधव आणि इंजिनिअर तळेले साहेब यांनीही उपस्थिती लावली. उद्योजकांसह नागरिकांकडून उपक्रमाचे कौतुक या उपक्रमाला उद्योजक गणेश महाजन, बाळू महाजन, अक्षय मुथा, राजमल संचेती, प्रथम सूर्यवंशी, निलेश महाजन, पृथ्वी चव्हाण, किरण महाजन, अरुण चौधरी, हरीश डेडिया, प्रमोद जगताप, चंद्रकांत अमृतकर, दिनेश येवले, पांडुरंग महाजन आणि राजू बोरसे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट दिली.

बापुसाहेब घोडेस्वार यांना राज्यस्तरीय 'आदर्श पत्रकारिता पुरस्कार'

पुरस्कार आई-वडिलांसह स्वीकारत केला कृतज्ञतेचा भावनिक आविष्कार

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर । प्रतिनिधी: स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित 'राज्यस्तरीय सन्मान २०२६' सोहळ्यात जामखेड येथील युवा पत्रकार बापुसाहेब रावसाहेब घोडेस्वार यांना 'आदर्श पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, गेल्या सहा महिन्यांत त्यांना मिळालेला हा सहावा राज्यस्तरीय पुरस्कार असल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल पत्रकारिता, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान अहिल्यानगर येथे आयोजित हा पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. स्वराज्य सरपंच सेवा संघाचे सचिव तथा सरपंच संघटित चळवळीचे प्रणेते बाबासाहेब पावसे पाटील, संघटनेचे अध्यक्ष रोहित संजय पवार आणि प्रमुख अमोल शेवाळे यांच्या हस्ते बापुसाहेब घोडेस्वार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाही फेटा, सन्मानचिन्ह आणि आकर्षक ट्रॉफी असे या पुरस्काराचे स्वरूप होते. आई-वडिलांचाही शाही सन्मान; सोहळ्यात भावनिक क्षण या पुरस्कार सोहळ्यातील विशेष आकर्षण म्हणजे बापुसाहेब घोडेस्वार यांनी हा सन्मान आपल्या आई-वडिलांसोबत स्वीकारला.



यावेळी त्यांच्या आई-वडिलांनाही व्यासपीठावर शाही फेटा बांधून सन्मानित करण्यात आले. मुलाच्या यशात आई-वडिलांच्या योगदानाचा गौरव करणाऱ्या या प्रसंगाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. आपल्या यशाचा आनंद पालकांसोबत वाटून घेत त्यांनी कुटुंबाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. हा भावनिक क्षण सोहळ्यातील लक्षवेधी ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रती कृतज्ञता पुरस्कार स्वीकारल्यानंतर बापुसाहेब घोडेस्वार यांनी आपल्या भावना व्यक्त करताना भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती प्रथम कृतज्ञता व्यक्त केली. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. या सोहळ्याला त्यांचे भाचे व मित्र दादा घोडेस्वार, सचिन घोडेस्वार यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. जामखेडच्या शिरपेचात मानाचा तुरा बापुसाहेब घोडेस्वार यांना मिळालेल्या या सन्मानामुळे जामखेडच्या पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे. पुढील काळातही पत्रकारितेच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न मांडण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे सुरू राहावे, अशा शुभेच्छा त्यांना दिल्या जात आहेत.स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित 'राज्यस्तरीय सन्मान २०२६' सोहळ्यात जामखेड येथील युवा पत्रकार बापुसाहेब रावसाहेब घोडेस्वार यांना 'आदर्श पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, गेल्या सहा महिन्यांत त्यांना मिळालेला हा सहावा राज्यस्तरीय पुरस्कार असल्याचे सांगण्यात आले. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान अहिल्यानगर येथे आयोजित हा पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दुधगाव येथे बजावला मतदानाचा हक्क!



जन सम्राट टाईम्स

जिंतूर । प्रतिनिधी: मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दुधगाव (ता. जिंतूर) येथे मतदानाचा हक्क बजावला. लोकशाही व्यवस्थेत मतदानाला अनन्यसाधारण महत्त्व असून, प्रत्येक मत लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरते. मतदानाच्या माध्यमातून नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे मतदारांनी आपल्या मतदानाच्या हक्काचा जाणीवपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. विकसित महाराष्ट्र, सुशासन आणि राज्याच्या सर्वांगीण प्रगतीच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी मतदारांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले. लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविण्याचे आवाहनही करण्यात आले.

सारोळा शाळेत अजयदादा काशिद यांचा अभिष्टचिंतन सोहळा!

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी १५ वर्षांपासून योगदान; इस्रो परीक्षेत जिल्ह्यात प्रथम आलेल्या धनश्री काशिदचा गौरव

जन सम्राट टाईम्स

जामखेड। प्रतिनिधी: जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथे २२ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सारोळा गावचे सरपंच अजयदादा काशिद यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात पार पडला. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या १५ वर्षांपासून त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव यावेळी करण्यात आला. शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांचा सन्मान, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षण अशा विविध उपक्रमांमुळे हा सोहळा विशेष ठरला. १५ वर्षांच्या योगदानाचा गौरव; 'श्रीमान योगी' पुस्तक भेट शाळेच्या विकासासाठी अजयदादा काशिद यांनी दिलेले योगदान, त्यांची सामाजिक कार्यातील तळमळ, नेतृत्वगुण आणि विद्यार्थ्यांविषयीचा जिव्हाळा यांचा उपस्थित मान्यवर, शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून गौरव केला. शाळेच्या वतीने त्यांना शिवकालीन ऐतिहासिक कादंबरी 'श्रीमान योगी' भेट देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रितूताई अजयदादा काशिद होत्या. यावेळी केंद्र समन्वयक माजीद शेख यांचाही शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. आपल्या मनोगतात अजयदादा काशिद यांनी शाळेच्या भविष्यातील सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. इस्रो परीक्षेत धनश्री काशिदचे जिल्ह्यात प्रथम स्थान इस्रो परीक्षेच्या जिल्हास्तरीय निवड चाचणीत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल धनश्री अनिल काशिद हिचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिच्या या यशामुळे तिला विमानप्रवास करण्याची तसेच केरळ येथील थुंबा स्पेस सेंटरला भेट देण्याची संधी मिळणार आहे. धनश्रीच्या यशाचे उपस्थितांनी



कौतुक करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक महत्त्वाकांक्षा वाढविण्यासाठी अशा यशाचे कौतुक प्रेरणादायी ठरते. वाढदिवसानिमित्त वृक्षसंवर्धनासाठी पाण्याची मदत अजयदादा काशिद यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शाळेच्या परिसरातील झाडांचे संगोपन करण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश मुळे आणि उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे यांनी प्रत्येकी एक टँकर पाणी देण्याचे सहकार्य केले. तसेच माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर सातपुते यांनी दोन टँकर पाण्यासाठी रोख स्वरूपात देणगी दिली. या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरातील वृक्षसंवर्धनाला मदत होणार असून, पर्यावरणाविषयी सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. प्लास्टिक संकलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना साखरेचे प्रोत्साहन अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अजयदादा काशिद यांनी प्लास्टिक संकलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या प्लास्टिकच्या वजनाइतकी साखर त्यांना वाटप करण्यात आली. या उपक्रमातून प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. कचऱ्याचे योग्य संकलन आणि पर्यावरणपूरक सवयी लहान वयातच रुजविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानातील यशाचा आनंदोत्सव 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात सलग दोन वर्षे द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथील आजी-माजी विद्यार्थ्यांसाठी अजयदादा काशिद यांच्या वतीने विशेष स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. पावभाजी, गुलाबजाम, व्हेज पुलाव आणि मठ्ठा अशा मेजवानीचा विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. शाळेच्या यशात योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासोबतच त्यांना भविष्यातही उत्तम कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. मान्यवर, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांची उपस्थिती या कार्यक्रमास सरपंच रितूताई अजयदादा काशिद, जिल्हा नियोजन समिती सदस्य अजय काशिद, ग्रामपंचायत सदस्य किरण मुळे, बापू तांबे, मकरंद पवार, केंद्र समन्वयक माजीद शेख, ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे, माजी अध्यक्ष किशोर सातपुते, उपाध्यक्ष देविदास पवार, पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे, राहुल लिमकर, अर्चना त्रिमुखे, उपशिक्षक प्रशांत होळकर, शबाना शेख, वृषाली खांदवे आणि अमृता रसाळ यांच्यासह पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. शैक्षणिक प्रगती, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातून शाळा आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथे २२ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सारोळा गावचे सरपंच अजयदादा काशिद यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात पार पडला. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या १५ वर्षांपासून त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव यावेळी करण्यात आला. शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांचा सन्मान, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षण अशा विविध उपक्रमांमुळे हा सोहळा विशेष ठरला. १५ वर्षांच्या योगदानाचा गौरव; 'श्रीमान योगी' पुस्तक भेट शाळेच्या विकासासाठी अजयदादा काशिद यांनी दिलेले योगदान, त्यांची सामाजिक कार्यातील तळमळ, नेतृत्वगुण आणि विद्यार्थ्यांविषयीचा जिव्हाळा यांचा उपस्थित मान्यवर, शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून गौरव केला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी : विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. राज्यातील दुष्काळाचे तातडीने निवारण, वनहक्कधारकांना जमिनीचा सातबारा उतारा, भूमिहीन ग्रामीण कष्टकऱ्यांना आर्थिक मदत आणि मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला विरोध अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

मोर्चानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. कल्याण भवन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा कल्याण भवन येथून मोर्चाला सुरुवात झाली.

फाशीपूल आणि बसस्थानक मार्गे हा मोर्चा जेलरोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पोहोचला. मोर्चात सहभागी आंदोलकांनी विविध मागण्यांचे फलक हातात घेऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनात शेतकरी, आदिवासी, वनहक्काचे दावेदार, भूमिहीन शेतमजूर, महिला आणि विद्यार्थ्यांसह शेकडो नागरिक सहभागी झाले होते. विविध प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन संबंधित घटकांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. दुष्काळ निवारण आणि कष्टकऱ्यांना आर्थिक मदतीची मागणी राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे तातडीने निवारण करून त्याचा फटका बसलेल्या शेतकरी आणि ग्रामीण कष्टकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी मोर्चाद्वारे करण्यात आली.

वनहक्काचे दावेदार असलेल्या शेतकऱ्यांसह भूमिहीन ग्रामीण कष्टकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली.

याशिवाय, आदिवासी वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र वनहक्कधारकांना त्यांच्या हक्काच्या जमिनीचा सातबारा उतारा मिळावा, अशी मागणी करण्यात आली. वनहक्काच्या दाव्यांबाबत प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

मतदार यादीच्या पुनरीक्षण प्रक्रियेलाही विरोध

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेबाबतही सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेने विरोधाची भूमिका मांडली. या प्रक्रियेसंदर्भातील आक्षेप आणि मागण्यांची दखल घेऊन प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.

नागपूरच्या दीक्षाभूमीवर ७० वा धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिन उत्साहात

धम्मदीक्षा विधी सोहळ्यात बावीस प्रतिज्ञांचे सामूहिक वाचन

जन सम्राट टाईम्स

नागपूर । प्रतिनिधी : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीचे साक्षीदार असलेल्या नागपूरच्या दीक्षाभूमीवर ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिनानिमित्त धम्मदीक्षा विधी सोहळा पार पडला. या सोहळ्याला आदरणीय आर्य नागार्जुन सुरई ससाई आणि भिक्खू संघाची उपस्थिती लाभली. भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत अनुयायांनी धम्मक्रांतीच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा दिला. बावीस प्रतिज्ञांचे सामूहिक वाचन या सोहळ्यातील महत्त्वपूर्ण भाग म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक बावीस प्रतिज्ञांचे शिबिरार्थींकडून सामूहिक वाचन करण्यात आले. या प्रतिज्ञांमधून विवेकनिष्ठ विचार, अंधश्रद्धेपासून मुक्त जीवन, समता आणि बौद्ध धम्माच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित झाले. बावीस प्रतिज्ञा या केवळ ऐतिहासिक



दस्तऐवज नसून सामाजिक परिवर्तन, स्वाभिमान आणि नैतिक जीवनाची दिशा देणारा विचारवारसा आहे. त्यातील मूल्ये समजून घेऊन दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची प्रेरणा या सोहळ्यातून देण्यात आली. दीक्षाभूमीचा ऐतिहासिक वारसा १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या याच दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. भारतीय इतिहासातील या महत्त्वपूर्ण घटनेने सामाजिक परिवर्तनाला नवी दिशा दिली. जातिभेद, विषमता आणि अन्यायाविरुद्ध लढा देत समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार त्यांनी समाजासमोर मांडला. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नसून सामाजिक समतेच्या मूल्यांचे पुनर्स्मरण करून देणारा आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारा दिवस मानला जातो. बुद्ध आणि बाबासाहेबांच्या विचारांचा जागर दीक्षाभूमीवरील धम्मदीक्षा विधी सोहळ्याच्या निमित्ताने भगवान गौतम बुद्धांचा शांती, करुणा आणि प्रज्ञेचा संदेश तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा विचार पुन्हा अधोरेखित झाला. समाजात विवेकनिष्ठ दृष्टिकोन रुजविणे, अंधश्रद्धेपासून दूर राहणे आणि मानवी मूल्यांचा सन्मान करणे, ही धम्मविचारांची महत्त्वाची शिकवण आहे.

नशिराबाद नगरपरिषदेत मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात AC बसविल्याप्रकरणी चौकशीची मागणी!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । (प्रतिनिधी): नशिराबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रविंद्र रघुनाथ सोनवणे यांच्या दालनात वातानुकूलित यंत्र (AC) बसविण्यात आल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी जळगाव जिल्हा जनरल कामगार सेनेचे अध्यक्ष प्रदीप अनिल साळी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जळगावचे जिल्हाधिकारी आणि नाशिकचे विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला आहे. सार्वजनिक निधीतून करण्यात आलेल्या या खर्चाला आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मंजुरी होती का, तसेच शासन निर्णयातील तरतुदींचे पालन झाले का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रार अर्जानुसार, मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात २२ मार्च २०२२ पासून वातानुकूलित यंत्र बसविण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २५ मे २०२२ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ



देत, संबंधित पदाची वेतनश्रेणी आणि AC सुविधेसाठी लागू असलेल्या पात्रतेची पडताळणी करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. AC खरेदी प्रक्रिया आणि खर्चाच्या नोंदी तपासण्याची मागणी वातानुकूलित यंत्राच्या खरेदीसाठी काढण्यात आलेले बिल, खरेदी आदेश, प्रशासकीय मंजुरी, निविदा अथवा कोटेशन प्रक्रिया, अर्थसंकल्पातील तरतूद आणि संबंधित लेखा नोंदींची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तसेच AC बसविल्यानंतर झालेल्या वीजखर्चाची तपासणी करून सार्वजनिक निधीचा वापर नियमानुसार झाला आहे की नाही, हे स्पष्ट करावे, असेही तक्रारदाराने नमूद केले आहे. संबंधित खर्चासाठी आवश्यक मंजुरी घेण्यात आली होती का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनियमितता आढळल्यास जबाबदारी निश्चित करण्याची मागणी या प्रकरणाच्या चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी प्रदीप साळी यांनी केली आहे. आवश्यक असल्यास खर्चाच्या वसुलीबाबतही नियमांनुसार निर्णय घ्यावा, असे तक्रार अर्जात म्हटले आहे. प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करावी, तसेच चौकशीचा अहवाल आणि अंतिम निर्णय तक्रारदाराला कळवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

बापाचा स्मृतिदिन अंध विद्यार्थ्यांसोबत; मुलींनी अन्नदानातून जपली सामाजिक बांधिलकी!

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: वडिलांच्या आठवणी जपताना सामाजिक बांधिलकीची जाणीवही जिवंत ठेवता येते, याचा प्रत्यय बिलाडी येथील अहिरे कुटुंबाने दिला आहे. आधार रूपला अहिरे यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या मुलींनी धुळे शहरातील अंध मुला-मुलींच्या शाळेत अन्नदान केले. सुमारे ८० विद्यार्थ्यांना भोजन देत आणि त्यांची आपुलकीने विचारपूस करत कुटुंबीयांनी वडिलांना अनोखी आदरांजली अर्पण केली. या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. स्मृतिदिनाला सामाजिक सेवेची जोड बिलाडी गावातील आधार रूपला अहिरे यांचे वर्षभरापूर्वी निधन झाले. त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त केवळ पारंपरिक पद्धतीने स्मरण करण्याऐवजी समाजातील गरजू घटकांसाठी काहीतरी करण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. त्यानुसार धुळे शहरातील गणपती मंदिर परिसरात असलेल्या अंध मुला-मुलींच्या शाळेत अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भोजन



देण्यासोबतच त्यांच्याशी संवाद साधत आपुलकी व्यक्त करण्यात आली. वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ केलेल्या या सामाजिक कार्यामुळे स्मृतिदिनाला सेवाभावाची जोड मिळाली. कुटुंबीयांनी जपलेली ही संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. कुटुंबीयांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमावेळी सुकलाल बैसाणे, प्रतिभा सुकलाल बैसाणे, सीमा पंडित मोहिते, पंडित दगा मोहिते, मिराबाई आधार अहिरे, मनोहर आधार अहिरे, निकिता मनोहर अहिरे, दीपाली आनंद अहिरे, महिमा सुकलाल बैसाणे, कीर्ती पंडित मोहिते, हर्ष पंडित मोहिते, प्रशिक सुकलाल बैसाणे, जान्हवी मनोहर अहिरे, संविधान मनोहर अहिरे, सिद्धार्थ मनोहर अहिरे आणि शौर्य आनंद अहिरे आदी उपस्थित होते. वडिलांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त अंध विद्यार्थ्यांना भोजनदान करून अहिरे कुटुंबाने त्यांच्या आठवणींना सामाजिक सेवेच्या माध्यमातून उजाळा दिला. माणुसकी, आपुलकी आणि सामाजिक जाणीव जपणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरला आहे. वडिलांच्या आठवणी जपताना सामाजिक बांधिलकीची जाणीवही जिवंत ठेवता येते, याचा प्रत्यय बिलाडी येथील अहिरे कुटुंबाने दिला आहे. आधार रूपला अहिरे यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या मुलींनी धुळे शहरातील अंध मुला-मुलींच्या शाळेत अन्नदान केले. सुमारे ८० विद्यार्थ्यांना भोजन देत आणि त्यांची आपुलकीने विचारपूस करत कुटुंबीयांनी वडिलांना अनोखी आदरांजली अर्पण केली. या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

स्पर्धा परीक्षार्थींसाठी 'MahaGKNotes' वेबसाईटचे उद्घाटन

MPSCसह विविध स्पर्धा परीक्षांचे दर्जेदार अभ्यास साहित्य आता अल्प दरात एकाच व्यासपीठावर

जन सम्राट टाईम्स

जामनेर। प्रतिनिधी: MPSC आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या महाजीकेनोट्स (MahaGKNotes) या शैक्षणिक वेबसाईटचे उद्घाटन राज्याचे मंत्री गिरीश महाजन आणि जामनेरच्या नगराध्यक्षा साधनाताई महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या वेबसाईटवर विविध विषयांच्या नोट्स, वस्तुनिष्ठ प्रश्न, वन-लाइनर्स तसेच स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अभ्यास साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. डिजिटल माध्यमातून विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक सोपा, नियोजनबद्ध आणि परिणामकारक व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. 'सर्व स्पर्धा परीक्षांसाठी एकच ठिकाण' 'MPSC व सर्व स्पर्धा परीक्षांसाठी एकच ठिकाण' या संकल्पनेतून MahaGKNotes हे व्यासपीठ साकारण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे अभ्यास साहित्य सहज उपलब्ध व्हावे आणि त्यासाठी होणारा खर्च कमी व्हावा, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या वेबसाईटमुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अभ्यास साहित्य



एकाच ठिकाणी मिळण्यास मदत होणार असून, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या उद्घाटनप्रसंगी जामनेर तालुका एज्युकेशन सोसायटीचे सचिव जितेंद्र पाटील, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कडू माळी, स्वीय सहाय्यक दीपक तायडे, आयएमआर कॉलेजचे सचिव दीपक पाटील,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य नितीन झाल्टे, प्रदीप माळी, आकाश सोनवणे आणि स्नेहा सोनवणे उपस्थित होते. तसेच MahaGKNotes वेबसाईटचे संचालक आणि इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, जामनेरचे प्राचार्य डॉ. किशोर पाटील व डॉ. तेजश्री पाटील यांचीही उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षार्थींना दर्जेदार आणि परवडणारे अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची नवी संधी मिळणार आहे गिरीश महाजन आणि जामनेरच्या नगराध्यक्षा साधनाताई महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या वेबसाईटवर विविध विषयांच्या नोट्स, वस्तुनिष्ठ प्रश्न, वन-लाइनर्स तसेच स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अभ्यास साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. डिजिटल माध्यमातून विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक सोपा, नियोजनबद्ध आणि परिणामकारक व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे अभ्यास साहित्य सहज उपलब्ध व्हावे आणि त्यासाठी होणारा खर्च कमी व्हावा, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या वेबसाईटमुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अभ्यास साहित्य एकाच ठिकाणी मिळण्यास मदत होणार असून, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरेल.

नवी मुंबईकरांना दिलासा! पाणीकपात होणार नाही



जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: नवी मुंबई शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे नियोजन, धरणातील पाणीसाठा आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटींबाबत महानगरपालिकेत तहकूब महासभेत पाणी जियोजन विषयावर चर्चा करण्यात आली. राज्य शासनाने सर्व पालिकांना 10 टक्के पाणी कपातीचे आदेश दिले आहेत. मात्र नवी मुंबई पालिकेत कोणतीही कपात होणार नाही अशी घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली आहे. त्यानुसार शुक्रवारी महासभेत पाणी कपात न करण्याचे निर्देश महापौर सुजाता पाटील व सभागृह नेते सागर नाईक यांनी आयुक्तांना दिले. यावेळी आयुक्तांनी पाणी नियोजनावर भर देत पाणी वाचवण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सभागृहात सांगितले. आयुक्तांनी मोरबे धरणावर माहिती दिली. धरणाचा एकूण संकल्पित साठा १९० दशलक्ष घनमीटर इतका आहे. २३ ऑक्टोबर २०२६ च्या सकाळी उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, धरणात १६० दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध आहे.